# एम. ए भाग 1 अर्थशास्त्र सत्र 1 Agricultural Economics या पेपरमध्ये सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे समाविष्ट भाग

## किमान तोटा तत्व

कृषी व्यवस्थापनाचे वरील तत्व उत्पादकाला आपला कमीत कमी तोटा कसा ठेवता येईल याबाबत मार्गदर्शन करते कमीत कमी तोटा साध्य करण्यासाठी कृषी व्यवसायामधील केल्या जाणाऱ्या खर्चाचा विचार अत्यंत महत्वपूर्ण ठरतो कारण कृषी व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेत खर्च हा घटक महत्त्वाचा असतो एकुण उत्पादनातून लेखन खर्च वजा केला असता निव्वळ उत्पन्न किती आहे ते समजते. उत्पन्न वाढविण्याचा एक मार्ग म्हणजे खर्च किमान पातळी ठेवणे हा आहे.

इतर व्यवसायांप्रमाणे कृषी व्यवसायात देखील काही घटकांवर केला जाणारा खर्च हा स्थिर खर्च स्वरूपाचा असतो म्हणजेच उत्पादन वाढविले अगर कमी केले किंवा उत्पादन शुन्य असले तरी असा खर्च करावाच लागतो आणि तो खर्च स्थिर स्वरूपाचा असतो. मात्र दीर्घकाळाचा विचार करता सर्वच खर्च हे बदलणारे असतात बदलता खर्च हा उत्पादनाच्या प्रमाणानुसार बदलत असतो म्हणजेच उत्पादनात वाढ केल्यास बदलता खर्च वाढतो यावर उत्पादन कमी केल्यास बदलता खर्च देखील कमी होतो उत्पादनाचा एकूण खर्च हा स्थिर खर्च आणि बदलता खर्च यांनी मिळून निश्चित होत असतो. शेतकऱ्याला कृषी व्यवस्थापनामध्ये उत्पादनासंबंधी निर्णय घेत असताना खर्चाचा विचार करावा लागतो अल्पकाळ आणि दीर्घकाळाच्या संदर्भात उत्पादन खर्चाचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे असते

## अल्पकाळ

अल्पकाळ हा काही महिने किंवा एक वर्षापर्यंतचा असतो त्यामुळे या छोट्या कालावधीत नफा किंवा तोटा यापैकी कोणतीही अवस्था असू शकते परंतु शेतकऱ्याचा प्रयत्न हा किमान मिळणाऱ्या उत्पादना मधून त्याचा बदलता खर्च तरी भरून निघेल असा असला पाहिजे अल्पकाळात सीमांत खर्च हा सीमांत प्राप्ती बरोबर असला पाहिजे तरच उत्पादनातील तोटा टाळता येतो जोपर्यंत सीमांत खर्चापेक्षा सीमांत प्राप्ती जास्त मिळत आहे तोपर्यंत उत्पादन वाढविता येते अल्पकाळात जरी तोटा झाला तरी उत्पादन बंद न करता तोटा कमीत कमी

पातळीला ठेवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक ठरते जर एकूण खर्चापेक्षा एकूण उत्पन्न कमी असेल पण त्यातून बदलता खर्च भरून निघत असेल तरी उत्पादन सुरू ठेवण्यास कोणतीही अडचण नसते कारण अशा स्थितीत होणारा तोटा किमान करता येतो शेतीमध्ये अशी परिस्थिती बरेचदा असते जेव्हा सीमांत प्राप्ती ही सरासरी एकूण खर्चापेक्षा कमी असते तरी देखील उत्पादन चालू ठेवले जाते याचे कारण म्हणजे जरी प्राप्ती कमी असली तरी त्यामधून सरासरी बदलता खर्च भरून निघत असतो म्हणजेच अशा स्थितीत तोटा कमीत कमी असतो

## <u>दीर्घकाळ</u>

दीर्घ कालावधी हा बराच मोठा असल्याने अशा कालावधीमध्ये सातत्याने तोटा होणे योग्य नसते तसे झाल्यास उत्पादन न करणे किंवा बंद करणे योग्य असते या काळात स्थिर खर्च आणि बदलता खर्च भरून काढूनही जास्त प्राप्ती होईल एवढे एकूण उत्पन्न् असायला पाहिजे महत्तम नफा मिळवणे हे प्रमुख उद्दिष्ट दीर्घकाळात असले पाहिजे त्या दृष्टीने शेतकऱ्यांनी उत्पादनाबाबत निर्णय घ्यायला पाहिजे अल्पकाळात जरी स्थिर खर्च भरून निघाला नाही तरी चालते कारण बदलता खर्च भरून निघतो मात्र दीर्घकाळात स्थिर आणि बदलता हे दोन्ही खर्च म्हणजेच एकूण खर्च भरुन निघणे आवश्यक असते.